MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@mercindia.org.in संकेतस्थळ : www.mercindia.org.in / www.merc.gov.in

दिनांक १८ जून, २०१४

प्रकरण क्र. २०१४/९०

## विद्युत अधिनियम, २००३ (विअ, २००३) च्या कलम (१५) च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) खाली नोटीस

**दि टाटा पॉवर कंपनी लि. (टीपीसी)** ने, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर क्षेत्रातील काही भाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासह त्यांच्या प्रचलित परवाना क्षेत्राला सलग लागून असलेल्या चेने आणि वर्सावे या गावातील समाविष्ट क्षेत्रामध्ये, विजेचे वितरण करण्यासाठी वितरण परवाना मंजूर करण्याकरिता अर्ज केला आहे.

२. **टीपीसी** ने, विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम (२) नुसार, त्यांच्या अर्जाची नोटीस 'डी एन ए', 'इंडियन एक्स्प्रेस', 'फायनान्शियल एक्स्प्रेस' 'लोकसत्ता' आणि 'प्रहार' या वर्तमानपत्रांच्या दि. ९ मे, २०१४ रोजीच्या स्थानिक आवृत्त्यांमध्ये प्रसिद्ध केली.

३. **टीपीसी** च्या प्रस्तावित परवाना क्षेत्राच्या सीमा स्थूलमानाने पुढीलप्रमाणे आहेत :- मुंबई शहर, मुंबई उपनगर जिल्ह्याच्या पश्चिम उपनगर क्षेत्रातील बांद्रा ते दहिसर हा भाग, मुंबई उपनगर शहर / जिल्ह्यातील पूर्व उपनगर क्षेत्रातील चुनाभट्टी ते विक्रोळी आणि मानखुर्द हा भाग, या प्रस्तावित क्षेत्रामध्ये चेने व वर्सावे या गावांसह मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या संपूर्ण क्षेत्राचा देखील समावेश आहे. चेने व वर्सावे ही गावे त्यांच्या विद्यमान परवान्याच्या क्षेत्रात समाविष्ट नाहीत, याची कृपया नोंद घेण्यात यावी. परवान्याच्या प्रस्तावित क्षेत्राची तपशीलवार माहिती हवी असणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी **टीपीसी** ने परवान्याच्या मंजुरीसाठी सादर केलेला अर्ज कृपया पाहावा. सदर अर्ज, www.merc.gov.in / www.mercindia.org.in या आयोगाच्या संकेतस्थळांवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

४. **टीपीसी** चे नोंदणीकृत कार्यालय बॉम्बे हाऊस, २४ होमी मोदी स्ट्रीट, मुंबई – ४०० ००१ येथे आहे.

५. **टीपीसी** ने आयोगाला सादर केलेल्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या जोडपत्रांसह आयोगाच्या www.merc.gov.in / www.mercindia.org.in या संकेतस्थळांवर किंवा कोणत्याही व्यक्तिला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ मध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचे पालन करून आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

६. वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करण्यात आलेल्या वरील अर्जाच्या नोटीशीच्या संदर्भात, जनतेकडून **सूचना आणि हरकती** प्राप्त झाल्या आहेत. उपलब्ध असलेल्या माहितीचा विचार केल्यानंतर, आयोगाचे सकृतदर्शनी समाधान झाले आहे की, अर्जदार प्रस्तावित क्षेत्रामध्ये विजेचा पुरवठा करण्याकरिता वितरण परवाना मंजूर करण्यासाठी अर्हताप्राप्त आहे. आयोग, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ नुसार, अर्जदाराने अधिनियम व विनियमातील आवश्यकतांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, अर्जदारास वितरण परवानाधारक म्हणून परवाना देण्याचे प्रस्तावित करीत आहे.

७. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम (१५) च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) अंतर्गत याद्वारे, आयोगाने **टीपीसी** ला वितरण परवाना मंजूर करण्याच्या प्रस्तावाच्या संदर्भात **सूचना किंवा हरकती**, असल्यास, त्या मागविण्यासाठी नोटीस देण्यात येत आहे. या **सूचना किंवा हरकती** वरील पत्त्यावर आयोगाकडे **मंगळवार, दि. ८ जुलै, २०१४** रोजी किंवा त्यापूर्वी खाली सही करणाऱ्यास प्राप्त होतील अशा बेताने पाठवाव्यात. या तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या सूचना किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

८. इच्छुक व्यक्तींनी त्यांच्या **सूचना किंवा हरकती**, असल्यास इंग्रजी किंवा मराठी भाषेत, (६ + १) प्रतींमध्ये, त्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेल आयडी, असल्यास, त्यासह पाठवाव्यात. तसेच **सूचना किंवा हरकती** कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहकांच्या वर्गवारीच्या वतीने दाखल करण्यात येत असल्यास तसे त्यात नमूद करावे. तसेच सूचना किंवा हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिला त्याचे म्हणणे आयोगासमोर व्यक्तिशः मांडावयाचे असल्यास तसे देखील त्यात नमूद करण्यात यावे, म्हणजे अशा व्यक्तीला आयोगातर्फे **गुरुवार, १० जुलै, २०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता, सेंट्रम हॉल, पहिला मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४००००५.** येथे आयोजित करण्यात येणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८ जून, २०१४**

**स्वाक्षरी/-**
**(अश्वनी कुमार)**
**सचिव, मविनिआ**